ISSN-2320-4439
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

Special Issue II Aug.2020



ART'S I COMMERCE I SCIENCE I SOCIAL SCIENCE I
EDUCATION I MANAGEMENT I MEDICAL I ENGINEERING & IT I
LAW I PHARMACY I PHYSICAL EDUCATION I AGRICULTURE I
JOURNALISM I MUSIC I LIBRARY SCIENCE I

Editor **Dr. Sadashiv H. Sarkate**
E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

RNI No.MAHAUL03008/13/1/2012-TC

ISSN 2320-4494

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Peer Review Refereed Research Journal

*Special Issue II August 2020*

Editorial Officer
**Kranti Publication**
Georai Dist.Beed
Beed -431 127
Contact : 7875827115
**E-mail :** Sarkatelata@gmail.com

**Published By :**
Mrs. Lata Sadashiv Sarkate

**Price :** Rs. 300/-

**Advisory :-**

**Hon. Dr. Sudhir Gavhane**
Ex.Vice Chanciler Y.C.M.U. Nasik
& Professor of Mass Communication
& Jornalism Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. V. B. Bhise**
Ex-Professor, Dept. of Economics
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Madan Shivaji**
Ex-Management Council Member
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Bhagwat Katare**
Ex. Director, BCUD
Dr.B.A.M.U. Aurangabad

**Hon. Dr. Sanjay Nawale**
Head of Dept. Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Hon. Dr. Paralikar Kanchan**
Principal, Mahila College, Georai

**Hon. Dr. Ashok Mohekar**
Ex-Magement Council Member
Dean, Faculty of Science,
Dr.B.A.M.U. Aurangabad

**EDITOR**

***Dr.Sadashiv Haribhau Sarkate***
Senate Member, Ex-Chairman-BOS in Marathi, Dr.B.A.M.U.Aurangabad
Associate Professor & Head, Dept. of Marathi, JBSPM's
Arts & Science College, Shivajinagar, Gadhi Tq. Georai Dist. Beed.

**EDITOR BOARD**

**Dr. Mala Nurilmala**
Dept.of Aquatic Product Technology
Faculty of Fisheries and Marine Sciences
Bogor Agricultural University, Indonsia

**Dr. Bharat Handibag**
Ex-Dean, Faculty of Arts
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Dhere R.M.**
Dept.of Zoology
Swa.Sawarkar Mahavidayala, Beed

**Dr. Vasant Biradar**
Princial, Mahatma Phule
Mahavidyalaya,Ahmedpur,Dist.Latur

**Dr.Sudhakar Shendge**
Professor of Hindi
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr.D.P. Takale**
Professor & Head
Dept. of Economics
L.B.S.College, Partur Dist.Jalna

**Dr.Ganesh Adgaonkar**
Kalika Devi ,Collage
Shirur Kasar Dist.Beed

**Dr.Aparna Ashtaputre**
Dept. of Psychology,
Dr.B.A.M.U.Aurangbad

**Dr. Kadam Mangal S.**
PG. Dept.of Zoology
Yeshwant Mahavidayala, Nanded

**Dr. Rajesh Karpe**
Management Council Member
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr. Taher H. Pathan**
Aligad Muslim university, Aligad (U.P.)

**Dr.S.D.Talekar**
Professor, Dept. of Commerce
L.B.S.College, Partnr Dist Jalna

**Dr.S.R.Takale**
Principal, Sant Sawatamali, College,
Phulambri Dist. Aurangabad'

**Dr.Bharat Khandare**
Principal, Swami Vivekanand College,
Mantha. Dist. Jalna

**Dr.Vishwas Kadam**
Principal, JBSPM's Arts & Science
College, Gadhi Tq.Georai, Dist. Beed

**Dr.Fulchand Salampure**
Management Council Member
**Dr.B.A.M.U.Aurangabad**

**PEER REVIEW / REFERECS**

**Dr.Shahaji Gaikwad**
Ex-Chairman, BOS in English
Dr.B.A.M.U.Aurangabad

**Dr.Vishwas Patil**
Radha Nagari College,Radha
Nagari, Dist. Kolhapur

**Dr. Dilip Khairnar**
Professor, Sociology
Deogiri College, Aurangabad

**Dr. Santos Chavan**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Shivaji Yadhav**
Shivchhatrapati College,
Pachod, Dist. Aurangbad

**Dr. Laxmikant Shinde**
Assit.Professor
JES College, Jalna

**MANGING EDITORS**

**Mr. Ramesh Ringne**
**Prof. Bapu Ghokshe**
**Mr. Shivaji Kakade**
**Dr. Shakur Shaikh Husain**
**Mr. Vinod Kirdak**
**Dr. Datta Tangalwad**
**Mr. Kalandar Pathan**
**Dr. Suhas Morale**
**Dr. Baliram Katare**
**Assit.Prof.Mohan Kalkute**
**Dr. Adgaonkar Ganesh**
**Dr. Santosh Chavan**
**Dr. Rajkumar Yallawad**

## अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| 1 | Gender differences pertaining to work life balance | Nikhat Tabasum<br>Dr. B S Hugar | 1-7 |
| 2 | E-Learning - A New Direction Of Digital India | Adv. Dr.shivangi k.zarkar | 8-15 |
| 3 | Diara Land In The Holy Ganga Of Bihar | Dr. Alpna Jyoti | 16-19 |
| 4 | The Impact Of Training And Development On Organizational Overall Performance In It Industry | Shilpa S. Hiregoudar<br>Dr. Rekha N. Patil | 20-31 |
| 5 | Skill Development for college students : A March towards Employability | Dr.Sonkate Annarao Sayabanna | 32-34 |
| 6 | A Study On The Impact Of Performance Management Systems On Employee's Performance In Degree Institutions In Kalaburagi | Archana V. Padgul (M Kinagi)<br>Dr. Rekha N. Patil | 35-43 |
| 7 | Reading habit among Mahila Mahavidhyalay Georai :A Case Study | Dr.Sanjay L. Bhedekar | 44-46 |
| 8 | Library Accessibility To The Researchers And E-Resources Based Information Services | Dr.sanjay Bhedekar | 47-49 |
| 9 | The Ombudsman Scheme for Non-banking Financial Companies 2018-An Overview | Dr.Swati Joshi | 50-55 |
| 10 | Ego As Premise Of Objectivism In Ayn Rand's Theory | Dr.Pradip.G.Sonawane | 56-58 |
| 11 | Review on-Hydrothermal synthesis of Cobalt Ferrite and substituted Cobalt Ferrite | Santosh M. Arade | 59-63 |
| 12 | Agricultural problems in Marathwada Region | Dr. Syed Tanvir Badruddin | 64-67 |
| 13 | Attractive result for some non linear functional differential and intergral equation | Mr.P. M. More | 68-78 |
| 14 | Ichalkaranji as a commercial tourism center in kolhapur district (ms): a geographical study | Dr. Dilip A. Gade | 79-87 |
| 15 | Digital transformation of academic libraries: Opportunities and Challenges. | Sarika Bhagwanrao Rengunthwar | 88-90 |
| 16 | Non performing assets performance in banking sector in india | Prof. Dr.Dattatraya S. Tambe | 91-97 |
| 17 | Effect Of Cadmium On Seedling Elongation In Cajanus Cajanl | Subodh Narayan | 98-101 |
| 18 | भारतीय अर्थव्यवस्थेवर कोरोनाचा परिणाम | डॉ. आर. एस. पवार<br>श्री. बाळासाहेब विश्वनाथ खोसे | 102-106 |
| 19 | महात्मा गांधी यांचे सामाजिक विचार | प्रा.मोहन बाबुराव चव्हाण | 107-113 |
| 20 | कला आणि मानवी जीवन | प्रा. केदार रविंद्र केंद्रेकर, | 114-117 |

# भारतीय अर्थव्यवस्थेवर कोरोनाचा परिणाम

**डॉ. आर. एस. पवार**
मार्गदर्शक, सहयोगी प्राध्यापक,
विभाग प्रमुख वाणिज्य विभाग
दयानंद वाणिज्य विद्यालय लातूर

**श्री. बाळासाहेब विश्वनाथ खोसे**
संशोधक विद्यार्थी
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

**कोरोना म्हणजे काय?**

कोरोना व्हायरस म्हणजे विषाणूंमधील अशी एक मोठी जात ज्यामुळे मानव किंवा प्राणी आजारी पडतात. मानवाला या विषाणूचा संसर्ग झाल्यास सर्दीपासून ते श्वसन यंत्रणेत संसर्ग होण्याचा धोका असतो. कोरोना व्हायरसमुळे Covid-१९ हा आजार होतो. याची सुरूवात डिसेंबर २०१९ च्या दरम्यान चीन मधील वुहान या शहरातून झाली आहे आणि हळूहळू याचा प्रादुर्भाव जागतिक पातळीवर होण्यास सुरूवात झाली. आज जगातील जवळपास १४९ देशामध्ये याचा प्रसार झाला आहे. विशेष बाब म्हणजे अजून तरी Covid-१९ वर उपचार करण्यासाठी कुठलीही लस किंवा विशिष्ट संसर्गरोधक औषध उपलब्ध झालेले नाही. पण ज्यांना संसर्ग झाला आहे, त्यांची लक्षणं बरी होतील याची काळजी घेतली गेली पाहिजे. गंभीर आजार असलेल्या लोकांना हॉस्पिटलमध्ये दाखल केले गेले पाहिजे. योग्य काळजी घेतली गेल्याने अनेक रूग्ण बरे झाले आहेत. यावरील संभाव्य लस आणि विशिष्ट औषधावर सध्या संशोधन सुरू आहे. त्यांच्या सध्या विविध वैद्यकीय चाचण्या सुरू आहेत. Covid-१९ रोखण्यासाठी आणि बरा करण्यासाठी लस आणि औषध निर्मितीच्या प्रयत्नांमध्ये जागतिक आरोग्य संघटना समन्वयाचे काम करत आहे. या विषाणूपासून जगभरात ३६४०८४८१ व्यक्ती संक्रमित झाले असून त्यापैकी जवळपास १०६१४६९ व्यक्तींचा मृत्यु झालेला आहे. त्यामुळे या विषाणूला रोखणे हे एक जागतिक आव्हाण म्हणून उभे राहिले आहे.

**प्रस्तावना :**

आज जगातील सर्वच देशाच्या अर्थव्यवस्था डबघाईला आल्या आहेत व दुसरीकडे दिवसेंदिवस कोरोना विषाणूचा विळखा वाढतच चालला आहे. त्यामुळे या दोन्ही समस्यांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या आजारामुळे जागतिक अर्थव्यवस्थेवर होणारे परिणाम आता स्थानिक पातळीवर स्पष्टपणे दिसायला लागलेत. सद्यस्थितीत प्रत्येक देशापुढे कोरोना वायरस चे भयावह संकट उभे राहिले आहे. यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेच्या विकासाला ब्रेक लागले आहे. सर्वच देश विकासाचा दृष्टीकोन समोर

ठेवून मार्गक्रमण करीत असतात. परंतु अशा काही समस्या निर्माण झाल्यास त्यांना विकासावरून लक्ष हटवून या समस्यांना प्रथम तोंड द्यावे लागते. याच पद्धतीने सध्या कोरोना वायरसने व्यक्तींनाच नव्हे तर प्रत्येक देशाच्या अर्थव्यवस्थेस बाधित केले आहे असेच म्हणावे लागेल. बऱ्याच मोठमोठ्या देशांनी आर्थिक आणीबाणीची घोषणा केली आहे. सध्या जगात आणि देशात बेकारीने कळस गाठला आहे. त्यातच कोरोनामुळे यात आणखी वाढ होण्याची भीती आहे.

कोरोना वायरसमुळे प्रभावित झालेले उद्योग :

**१. हवाई वाहतूक आणि पर्यटन व्यवसाय :**

सध्या कोरोना विषाणूच्या भीतीने पर्यटकांनी पर्यटनासाठी देश विदेशात जाणे बंद केले आहे. त्यामुळे पर्यटनाशी संबंधित असणारे लहाण मोठे उद्योग बंद पडण्याच्या स्थितीत आहेत. भारतातील गोवा सारख्या राज्याचे जवळपास ८० टक्के उत्पन्न हे पर्यटनापासून मिळते. विदेशी यात्रेकरूंची संख्या कमी असल्यामुळे बरीच उड्डाणे रद्द करावी लागत आहेत. कोरोना वायरसचा उद्रेक झाल्यामुळे हवाई वाहतुकीला मोठा फटका बसला आहे. यामुळे भारतीय विमान वाहतूक सेवा अनिश्चित काळासाठी बंद करण्यात आली आहे.

**२. हॉटेल व्यवसाय :**

भारतात कोराना विषाणूचा वाढता प्रभाव पाहता मार्च २०१९ मध्ये देशात लॉकडाऊनची घोषणा करण्यात आली. त्यामुळे हॉटेल व्यवसायिकांना जवळजवळ ६-७ महिने हॉटेल बंद ठेवावे लागले. त्यामुळे हॉटेल व्यवसायिकांचे उत्पन्न तर बुडालेच परंतु हॉटेल भाडे व इतर खर्च चालूच राहिल्यामुळे हॉटेल व्यवसायिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत. तसेच हॉटेल बंद राहिल्यामुळे कामगारांना बेकारीचा सामना करावा लागला.

**३. कुक्कुटपालन व्यवसाय :**

साधारण डिसेंबर २०१९ मध्ये कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावाला सुरूवात झाली. त्यानंतर त्याचा वेगाने प्रसार सुरू झाला. तसेच या आजाराविषयी संभ्रमावस्था असतानाच माहे फेब्रुवारी २०२० मध्ये कोरोनाचा प्रसार ब्रॉयलर चिकन खाल्ल्याने होतो अशी अफवा पसरली. त्यामुळे बऱ्याच लोकांनी चिकन खाणे सोडून दिले. याचा मोठा फटका कुक्कुटपालन व्यवसायिकांना बसला. या परिस्थितीत कुक्कुटपालन व्यवसायिकांना केवळ ५० रू. ते ६० रू. दराने चिकन विक्री करावी लागली.

**४. कृषी क्षेत्र :**

भारतात माहे मार्च २०१९ मध्ये देशात लॉकडाऊन झाल्यानंतर याचा परिणाम कृषी क्षेत्रावर पण झाला आहे. लॉकडाऊन दरम्यान माल वाहतूक व्यवस्था पूर्णपणे ठप्प असल्यामुळे शेतात पिकणारा माल इतर राज्यात विक्रीसाठी पाठविणे बंद झाले. याचा परिणाम शेतातील माल जागेवरच खराब झाला. त्यामुळे शेतकरी आणि शेतीवर आधारित असणारे छोटे मोठे व्यवसायिक आर्थिक अडचणीत सापडले आहेत.

**५. औषध निर्मिती (फार्मा) उद्योग :**

भारत जगातील प्रमुख औषध निर्यातक देशांपैकी एक आहे. भारताने गेल्या वित्तीय वर्षात २०१९ मध्ये जवळपास २४९०० कोटी रूपयांचे औषधे निर्यात केली आहेत. भारतात तयार होणाऱ्या औषध निर्मितीसाठी लागणारा ७० टक्के कच्चा माल चीन कडून आयात केला जातो. परंतु कोरोना विषाणुच्या पार्श्वभूमीवर चीन कडून मिळणारा औषध निर्मितीसाठी मिळणाऱ्या कच्चा मालात घट झाली. काही एंटीबायोटिक औषधे आणि एंटीपायरेटिक्सच्या बाबतीत भारत १०० टक्के चीनवर विसंबून आहे. यामुळे भारतीय औषध निर्मिती उद्योगांना तोटा सहन करावा लागत आहे.

**६. कापड उद्योग :**

भारतातून बऱ्याच देशांना कापड निर्यात केले जाते. परंतु कोरोना विषाणूच्या प्रादुर्भावामुळे कापड उद्योगासाठी लागणारा कच्चा माल निर्यातीत ५० टक्के पेक्षा कमी येण्याची शक्यता आहे. याचा सगळ्यात जास्त परिणाम सुती धाग्याच्या निर्यातीवर होण्याची शक्यता आहे. याचा परिणाम कापसाचे उत्पन्न घेणारे शेतकरी आर्थिक अडचणीत येण्याची शक्यता आहे. जे की आधीपासूनच कमी किंमतीवर कापसाची विक्री करत आहेत.


**७. निर्यातीत घट :**

कोरोनाचा पहिला फटका हा निर्यातीला बसला आहे. अनेक देशांची निर्यात ठप्प झाल्याचे दिसून येते. आपल्याकडील शेतकऱ्यापासून ते व्यापारी, कामगारापासून ते उद्योजकांपर्यंत सगळेच हवालदिल झाले आहेत. ग्लोबलायझेशनच्या काळात सर्वच देश एकमेकांवर अवलंबून असतो. त्यामुळे या प्रश्नांची दाहकता अधिकच वाढत आहे. अनेक उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. कापड, यंत्रमाग, छोटे-मोठे उद्योग, आयटी सर्व्हिसेस या सर्वच उद्योगांना त्याचा फटका बसणार आहे.

**८. ॲटोमोबाईल उद्योग :**

ॲटोमोबाईल क्षेत्रात आधिपासुनच भारतात घसरण सुरू आहे. त्यातच कोरोनामुळे चीनमध्ये आलेल्या मंदीमुळे भारतात येणारा माल बंद झाला आहे. चीनमधून बरेच वस्तुंचे सुटे भाग आयात केले जातात. परंतु हा माल येणे बंद झाल्यामुळे येथील कंपन्य कच्चा मालाअभावी बंद पडण्याच्या मार्गावर आहेत.?

**मागील सहा वर्षातील जीडीपी दरात झालेले बदल**



**मूल्यमापन :**

चीन मधील एका शहरापासून कोरोना वायरसची सुरूवात झाली आणि आज सर्व जगात प्रसार झाला आहे. कोरोना विषाणूमुळे जगामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. याचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवर झाला आहे. बरेच उद्योग बंद पडण्याच्या मार्गावर आहेत. कारण उत्पादित माल जागेवर तसाच पडून आहे. मालाची वाहतूक व विक्री ठप्प असल्यामुळे माल खराब होत आहे. याचा तोटा रोजगार क्षेत्राला बसत आहे. अनेक कामगारावर उपासमारीची वेळ येत आहे. जोपर्यंत यावर उपचार निघत नाही तोपर्यंत अर्थव्यवस्था सुरळीत होणार नसल्याचे चित्र दिसत आहे. अशीच परिस्थिती पुढे चालू राहिल्यास जागतिक महामंदी येण्याची शक्यता आहे. त्यामुळे प्रत्येक देशाने टप्प्या टप्प्याने उद्योग चालु करावेत जेणेकरून अर्थव्यवस्था रूळावर येण्यास मदत होईल. प्रत्येकाने आपआपली काळजी घेऊन आपले काम पार पाडणे महत्त्वाचे आहे.

**संदर्भ :**

१. बी.बी.सी. न्यूज

२. www.google.com/search

■■■